**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ कृषि नगर, अकोला (महाराष्ट्र) ४४४ १०४**

# जाहीरात

**क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१९** **दिनांक :- ०९ सप्टेंबर, २०१९**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (महाराष्ट्र राज्य) अंतर्गत विविध कार्यालयातील खालील प्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता दिनांक १०.१०.२०१९ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. या जाहीरातीव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल व आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| अक्र | पदनाम | वेतन बॅन्ड | समांतर आरक्षण ↓ | सामाजिक आरक्षण ↓ | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाव | आदुघ | खुला | एकूण पदे |
| १ | कृषि सहाय्यक (पदविधर) | ५२००-२०२००/- ग्रे.वे. २४००/- | महिला | | | | | | | | | | | ०१ | ०१ |
| | | | माजी सैनिक | | | | | | | | | | | | |
| | | | खेळाडु | | | | | | | | | | | | |
| | | | प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | | | |
| | | | भुकंपग्रस्त | | | | | | | | | | | | |
| | | | दिव्यांग | | | | | | | | | | | | |
| | | | अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | | | | |
| | | | अनाथ | | | | | | | | | | | | |
| | | | सर्वसाधारण | ०१ | | | | | | | | ०१ | ०१ | ०२ | ०५ |
| | | | **एकूण पदे** | **०१** | | | | | | | | **०१** | **०१** | **०३** | **०६** |
| | | | | | | | | | | | | | | | |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | ५२००-२०२००/- ग्रे.वे. २४००/- | महिला | | | | | | | | ०३ | ०२ | ०१ | ०६ | १२ |
| | | | माजी सैनिक | | | | | | | | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०६ |
| | | | खेळाडु | | | | | | | | ०१ | | | ०१ | ०२ |
| | | | प्रकल्पग्रस्त | | | | | | | | ०१ | | | ०१ | ०२ |
| | | | भुकंपग्रस्त | | | | | | | | | | | | |
| | | | दिव्यांग | **एकूण ०२ पदे :** ०१ स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/ मानसिक आजार (mental illness).<br>०२- बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व. | | | | | | | | | | | |
| | | | अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | ०१ | | ०१ | ०२ | ०४ |
| | | | अनाथ | | | | | | | | | | | | |
| | | | सर्वसाधारण | ०२ | | | ०१ | ०१ | | | ०४ | ०३ | ०२ | ०६ | १९ |
| | | | **एकूण पदे** | **०२** | | | **०१** | **०१** | | | **११** | **०६** | **०५** | **१९** | **४५** |

**<u>सज्ञांचे अर्थ</u>**

अजाः अनुसुचित जाती, अज : अनुसुचित जमाती, विजाः विमुक्त जाती, भज : भटक्या जमाती, इमाव : इतर मागास प्रवर्ग आणि विमाप्र : विशेष मागास प्रवर्ग, साशैमाव**:** सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग, आदुघः आर्थिकदृष्टया दुर्बल घटक

**आरक्षित पदे ही फक्त महाराष्ट्र शासनाने वेळोवळी अधिकृत केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षीत आहेत.**

**शैक्षणिक अर्हता**

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक (पदवीधर) | खालील विषयातुन पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>कृषि / उद्यानविद्या / वनशास्त्र / पशुविज्ञानशास्त्र / कृषि तंत्रज्ञान / कृषि अभियांत्रिकी / गृह विज्ञान / मत्स्य विज्ञान / जैवतंत्रज्ञान. |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणुन मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता. |

**टिप** :- वरिल तक्त्यातील दोन्ही संवर्ग जरी एकच असले तरी, सदरबाबत शैक्षणिक अर्हता वेगवेगळया विहीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे पदवी धारक उमेदवारांनी पदवीका अर्हता असलेल्या पदासाठी तसेच पदवीका धारक उमेदवारांनी पदवी अर्हता असलेल्या पदासाठी अर्ज केल्यास सदर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**निवड पध्दती**

| अ.क्र. | संवर्ग | निवड पध्दती | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक / व्यावसायिक चाचणी परिक्षा | मौखिक परिक्षा | एकुण |
| **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५.** | **६.** |
| १ | कृषि सहाय्यक (पदविधर) | २०० | -- | -- | २०० |
| २ | कृषि सहाय्यक (पदविका) | २०० | -- | -- | २०० |

१. शासन निर्णय क्रं प्रानिमं-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दिनांक १३ जुन, २०१८ मधील प्रावधनानुसार वरिल पदांसाठी लेखी परिक्षा घेण्यात येईल आणि लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणाणुक्रमे पर्याप्त संख्येत कागदपत्रे पडताळणी करीता उमेदवारांना बोलाविण्यात येईल. तसेच प्रत्यक्षात कागदपत्रे पडताळणीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांची लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच सदर शासन निर्णयातील प्रावधानानुसार गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

२. लेखी परिक्षेच्या अभ्यासक्रम (Syllabus) विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**वयोमर्यादा :**

अ. दिनांक १०.१०.२०१९ रोजी सर्वसाधारणतः उमेदवाराचे वय वर्षे १८ पेक्षा कमी व ३८ पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथीलक्षम राहील.

ब. शासन निर्णय व कृषी विद्यापीठ परिनियमानुसार खालील प्रमाणे कमाल वयोमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे.

| **अ.क्र.** | **वर्गवारी** | **कमाल वयोमर्यादा** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १. | दिव्यांग उमेदवार / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त | ४५ वर्षे | शासन निर्णयानुसार |
| २. | माजी सैनिक | १. सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी २. तसेच दिव्यांग माजी सैनिकांसाठी ४५ वर्षे कमाल मर्यादा | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | शासनातील अंशकालीन उमेदवार | ५५ वर्षे | शासन निर्णयानुसार |
| ४. | खेळाडु उमेदवार / स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित उमेदवार (विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्र जोडणे आवश्यक) | उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षानी शिथील तथापी कमाल वय ४३ पेक्षा जास्त नसावे. | |
| ५. | या विद्यापीठात तसेच महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठामध्ये नियमीत आस्थापनेवर वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | उच्चतम वयोमर्यादेची अट नाही. | कृषी विद्यापीठ परिनियम |
| ६. | राज्य शासन / केद्र शासन/ निमशासकीय संस्था / शासन अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नियमित आस्थापनेवर व वेतन श्रेणीमध्ये कार्यरत कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | ४५ वर्ष | शासन परिपत्रक दि ०१.११.०३ |

**महत्वाच्या सुचना :**

| | |
|---|---|
| १) | उमेदवारांनी विद्यापीठाचे www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचे असून, अर्ज करण्यासाठी लिंक दि. २०.०९.२०१९ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. |
| २) | अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने करावयाचे असल्याने विद्यापीठाचे संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार अचुक माहितीसह ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारास उचीत आवेदन शुल्काचा भरणा करण्यासाठी संकेतस्थळावर लिंक उपलब्ध होईल. सदर लिंकवरून नेटबँकीग / डेबीटकार्ड / क्रेडीटकार्ड व्दारे आवेदन शुल्काचा ऑनलाईन भरणा उमेदवारास करता येईल. ऑनलाईन अर्ज सादर करणे आणि आवेदन शुल्काचा भरणा करणेची मुदत अर्ज सादर करण्याच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच दि. १०.१०.२०१९ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंतच राहील तदनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाही तसेच याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. |
| ३) | विद्यापीठाच्या यापुर्वीच्या जाहिरातीस अनुसरून सादर केलेल्या अर्जाचा संदर्भ देवून उमेदवारास वयोमर्यादा, प्रक्रीया शुल्क अथवा कुठल्याच प्रकारची शिथीलता अनुज्ञेय असणार नाही. अशा उमेदवारास या जाहिरातीनुसार नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक राहील व अशा अर्जासोबत विहीत रकमेचे शुल्काचा भरणा करणे सुध्दा आवश्यक राहील. |
| ४) | वरिल प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त माहितीच्या आधारे प्रार्थमीकदृष्टया पात्र असलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल आणि लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी बोलाविण्यात येईल. पडताळणी दरम्यान कुठलेही आवश्यक दस्तावेज पुरविण्यास उमेदवार असमर्थ असल्यास असा उमेदवार गुणवत्ता यादीमध्ये अग्रक्रमावर असला तरी त्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ५) | अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना त्यामधील सर्व माहिती व सर्व बाबी काळजीपुर्वक पुर्ण व अचुक भरणे आवश्यक राहील. तसेच त्यांचेकडे अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास अर्जामध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध व वैध असणे आवश्यक राहील. एकदा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतरच्या दिनांकानंतरची कुठलेही कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येणार नाही किंवा कागदपत्रे पडताळणी दरम्यान अशा कागदपत्रांचा / प्रमाणपत्राचा स्विकार केला जाणार नाही तसेच अर्जदारास त्यामध्ये बदल अथवा दुरूस्ती करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| ६) | अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आयडीची नोंदणी काळजीपुर्वक करावी. त्यांचा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरती प्रक्रीया पुर्ण होइस्तोवर वापरात ठेवणे याबाबतची संपुर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील तसेच अर्जदाराने नोदविलेला मोबाईल नंबर किंवा ई-मेल आयडी बंद किंवा चुकीचा असल्यास अथवा बदलला गेल्यास त्यास मेल वा संदेश प्राप्त होणार नाही आणि त्यामुळे उदभवणा-या असुविधेस अथवा होणा-या परिणामास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, याची अर्जदार उमेदवारांनी नोंद घ्यावी. |

**आवेदन शुल्क**

१. मागावसर्गीय उमेदवारांकरिता — रू २५०/-

२. बिगरमागासवर्गीय उमेदवारांकरिता — रू ५००/-

**टिप – दिव्यांग व माजी सैनिक उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**सर्व साधारण शर्ती/अटी व सुचना :**

| | |
|---|---|
| १) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी व भारतीय नागरीक असावा (पुरावा म्हणून अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्राची प्रत (Domicile & Nationality Certificate) कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करणे आवश्यक राहील) |
| २) | उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ३) | काही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/जास्त बदल झाल्यास, तत्कालीन परिस्थितीनुसार परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे किंवा अशंता बदल करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार विद्यापीठाने स्वतःकडे राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. |
| ४) | समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दि. १९ डिसेंबर २०१८ आणि तदनंतर शासनाने त्यासंदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ५) | समांतर आरक्षणा अंतर्गत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या प्रवर्गातुन सर्वसाधारण पात्र उमेदवारातुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| ६) | ऑनलाईन अर्ज सादर करतांना उमेदवाराव्दारे उचीत समांतर आरक्षणाकरीताचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचा विचार फक्त संबंधीत सामाजिक प्रवर्गाचे सर्वसाधारण या समांतर आरक्षणातून करण्यात येईल. (उदा. बहुतांश प्रकरणी महिला उमेदवारांचे बाबतीत महिला समांतर आरक्षणाचा दावा अर्जामध्ये करण्यात येत नाही त्यामुळे त्यांची उमेदवारी संबंधीत सामाजिक प्रवर्गाचे सर्वसाधारण या समांतर आरक्षणातून ग्राहय धरण्यात येते.) |
| ७) | महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजीक प्रवर्गासाठी समांतर राहील, तथापी संबंधित प्रर्वगातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या पुरूष उमेदवारामधून भरण्यांत येतील. |
| ८) | खुल्या प्रवर्गासह सर्व प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षीत पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये नॉनक्रीमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबत (अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे तसेच त्यांचेकडे अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यादिनांकापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| ९) | दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांकडे सामाजिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र अप्रवि-२०१८/प्रक्र ४६/आरोग्य-६ दि. १४ सप्टेंबर २०१८ मध्ये नमुद केल्यानुसार ऑनलाईन प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| १०) | दिव्यांग प्रवर्गातून गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारास शासन परिपत्रक दि.०६.०५.२००४ मधील प्रावधानानुसार शासनाने नियुक्त केलेल्या वैद्यक मंडळाकडे तपासणीसाठी पाठविण्यात येईल आणि सदर मंडळाने उमेदवार संबधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करण्यात येईल अन्यथा त्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येवून त्यांची निवड रद्य करण्यात येईल. |
| ११) | दिव्यांग प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या पदासाठी सामाजीक आरक्षण लागू असणार नाही. सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर त्यास सामावुन घेण्यात येईल. तसेच ज्या सामाजीक प्रवर्गासाठी जाहिरातीमध्ये पदच उपलब्ध नसेल अशा प्रवर्गातील दिव्यांग उमेदवारास खुल्या प्रवर्गातून अर्ज करता येईल. |
| १२) | अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसांठी असलेले आरक्षणाबाबत, शासनाने दि. १ जुलै २०१६, शुध्दीपत्रक दि. १८ ऑगष्ट २०१६ तसेच दि. ११ मार्च २०१९ आणि तदनंतर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवाराकडे, सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र तसेच संबंधीत विभागीय उपसंचालक यांचे त्याबाबतचे पडताळणी प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पुर्वी असणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर उमेदवारास खेळाडू या समांतर आरक्षणासाठी पात्र समजण्यात येणार नाही. |
| १३) | अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी करणे आवश्यक राहील व अर्जदाराकडे नोंदणी प्रमाणपत्र नसल्यास आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. |
| १४) | शासन परिपत्रक क्र. पीआई/२००४/३८५५/प्रशि-१, दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक अथवा युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना पात्र समजण्यांत येईल. |

| | |
|---|---|
| १५) | वि.जा.भ.ज., विमाप्र, इमाव व साशैमाव (एसईबीसी) प्रवर्गातील सर्व उमेदवारांना सामाजीक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधीत उमेदवारांकडे अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध असलेले व त्यापुर्वी प्राप्त झालेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| १६) | आर्थिक दुष्टया दुर्बल घटकासाठीचे सक्षम प्राधिका-याचे विहीत नमुन्यातील पात्रता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्यांच्या दिनांकापासुन ६ महिन्यात सादर करणे आवश्यक राहील. |
| १७) | निवड प्रक्रीये दरम्यान लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणनिहाय उमेदवारांना पर्याप्त संख्येत कागदपत्रांची पडताळणीकरीता बोलाविण्यात येईल त्यावेळेस अर्ज सादर करण्याचे शेवटचे दिनांकास वैध व त्या दिनांकापुर्वी प्राप्त असलेले व ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जामध्ये उमेदवाराने भरलेल्या माहितीनुसारच कागदपत्रे व प्रमाणपत्रे ग्राहय धरण्यांत येतील याव्यतिरिक्त कुठलेच कागदपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवारांना लेखी परिक्षा व कागदपत्रे पडताळणी करीता नियोजित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| १८) | निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीनंतर कोणत्याहीक्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा अर्जदार अपात्र आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल. |
| १९) | शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र बीसीसी२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारास तात्पुरत्या नियुक्तीपासुन ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील जे उमेदवार सदर कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ होतील अशा उमेदवारांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील. |
| २०) | उपरोक्त पदासाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, (सेवायोजन कार्यालय), आदीवासी प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या जनगणना/अंशकालीन कर्मचाऱ्यांची शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी जाहीरातीत नमूद सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून त्या-त्या पदांसाठी विहीत आवेदन शुल्क भरून ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक राहील. |
| २१) | शासकीय-निमशासकीय सेवेत नियमीत आस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्वपरवानगीने सादर करावे व अशा परवानगीचे पत्र (ना हरकत प्रमाणपत्र) उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व ऑनलाईन अर्जामध्ये याची नोंद घेणे आवश्यक राहील. |
| **२२)** | या विद्यापीठा व्यतिरिक्त इतर आस्थापनांवरील कार्यरत कर्मचा-याची निवड झाल्यास विद्यापीठ सेवत रूजु होण्याकरीता त्यांना त्यांच्या पुर्वीच्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना विद्यापीठ सेवेत रूजु करून घेतले जाणार नाही. |
| २३) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील नियम ४ मधील तरतुदीनुसार लहान कुटूंब मर्यादेचे नमूना अ मधील प्रमाणपत्र ऑनलाईन अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. |
| २४) | निवड झालेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ व तदनंतर वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राष्ट्रीय निवृत्ती योजना लागू राहील. |
| २५) | वरिल नमुद शर्ती /अटी व सुचना शासनाचे सध्या अस्तीत्वात असलेले आदेश/नियम/प्रावधान विचारात घेवून प्रसिध्द करण्यात येत आहेत. तथापी प्रत्यक्ष पदभरतीची कार्यवाही करतांना शासनाचे तत्कालीन अस्तीत्वात असलेले आदेश /नियम/ प्रावधान विचारात घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| २६) | **अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.** |

उपरोक्त जाहीरात संकेतस्थळ (www.pdkv.ac.in) वर उपलब्ध आहे.

कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला